# महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग
## जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

शासन महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक-ईएसटी२०१०/प्र.क्र.४२/ई-८, दिनांक-०६ एप्रिल,२०११ व समक्रमांकाचे निर्णय दिनांक-३० जुलै,२०११ मधील तरतुदी नुसार विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने एका वेळी ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरावयाचे असुन त्याकरिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन विहीत नमुन्यात **दिनांक- ०२ मे, २०१७** पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे.

*****************************************************************************************

| | |
|---|---|
| पदाचे नांव | :- विधी अधिकारी |
| पद संख्या | :- ०१ (एक) |
| मासिक वित्तलब्धी | :- एकत्रित मानधन रु.२००००/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रु.५०००/- असे एकत्रित मानधन रु.२५०००/- प्रति महिना. या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाहीत. |

### शैक्षणीक अर्हता व अनुभव :-

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदविधर असेल. तो सनद धारक असेल.
२. विधी अधिकारी या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान सात वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
३. उमेदवार महसूल विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती व विभागीय चौकशा इत्यादी बाबत ज्ञान संपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो सक्षमतेने पार पाडू शकेल.
४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.
५. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

### विधी अधिकारी यांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदे विषयक बाबीबाबत/न्यायालयीन प्रकरणे सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. महसूल विषयक/परिच्छेद निहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे/सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापीत स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे. जिथे शासन प्रतिवादी आहे. अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र सबंधीत अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे.
४. शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवुन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.
५. जिथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयांचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
६. अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करुन तो संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागे पर्यंत पाठपुरावा करणे.
७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुण दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

### नेमणुकीचे स्वरुप :-

विधी अधिकारी हे पद नियमीत स्वरुपात नसुन ११ महिन्यांकरिता कंत्राटी तत्वावर भरण्यात येईल. सदर पदाची नेमणुक ही पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल. विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाहीत.